१) क्रियावाचक शब्दाला 'धातू' म्हणतात. पालिभाषेत हे धातू १) परस्मपद (परस्मैपद) व २) अत्तनोपद (आत्मनेपद) असे दोन पद प्रकारात विभागले गेले आहेत. मूळ धातूला परस्मैपदाचे प्रत्यय लावून क्रियापद बनवता येते. मात्र संस्कृतातील अनेक आत्मनेपदी धातू पालिभाषेत परस्मैपदी मानून चालवले जातात. एकंदरीत पालिभाषेत आत्मनेपदी क्रियापदांची रूपे कमी आहेत.

२) प्रामुख्याने पालिमध्ये परस्सपदाचा उपयोग करण्यात येतो. आत्मनेपद कर्मणि प्रयोग व कवितेत उपयोगात येते.

३) पालिभाषेत द्विवचन नसल्याने क्रियापद एकवचनी किंवा अनेकवचनी असते.



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

४) पालि व्याकरणात अनुक्रमे तीन पुरुष आहेत. पालि व मराठी व्याकरणातील पुरुषांमध्ये खालीलप्रमाणे क्रम आहेत-

| पालि | मराठी |
|---|---|
| उत्तम पुरिस | प्रथम पुरुष |
| मज्झिम पुरिस | द्वितीय पुरुष |
| पठम पुरिस | तृतीय पुरुष |

५) काळ व अर्थवाचक काही पालि संज्ञा पुढील प्रमाणे –

| | पालि | मराठी |
|---|---|---|
| १) | पच्चुपन्न कालो | वर्तमानकाळ |
| २) | हीय्यत्तनी /अतीत कालो | भूतकाळ |
| ३) | भविस्सन्ती /अनागत कालो | भविष्यकाळ |

## पच्चुपन्न कालो (वर्तमानकाळ)

वर्तमानकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढील प्रमाणे

| पुरिस | एकवचन | अनेकवचन | 'पच' - शिजविणे | | | 'अस' - असणे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरिस | एकवचन | अनेकवचन | पुरिस | एकवचन | अनेकवचन |
| उत्तमपुरिस | मि | म | उत्तमपुरिस | पचामि | पचाम | उत्तमपुरिस | अत्थि | सन्ति |
| मज्झिमपुरिस | सि | थ | मज्झिमपुरिस | पचसि | पचथ | मज्झिमपुरिस | अस्सि | अत्थ |
| पठमपुरिस | ति | अन्ति | पठमपुरिस | पचति | पचन्ति | पठमपुरिस | अस्मि, अम्हि | अस्म, अम्ह |

(खाद, नम, गच्छ, वस, कस इत्यादी धातू 'पच' प्रमाणे चालतात.)

## हीय्यत्तनी (भूतकाळ)

भूतकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे चालतात –

| पुरिस | एकवचन | अनेकवचन | 'खाद' - खाणे | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरिस | एकवचन | अनेकवचन |
| उत्तमपुरिस | इं | इम्ह | उत्तमपुरिस | खादिं | खादिम्ह |
| मज्झिपुरिस | इ | इत्थ | मज्झिपुरिस | खादि | खादित्थ |
| पठमपुरिस | इ | इंसु, उं | पठमपुरिस | खादि | खदिंसु, खादुं |

(कीळ, हस, लभ, गच्छ, वस इत्यादी धातू 'खाद' प्रमाणे चालतात.)

## भविस्सन्ती/अनागतकालो (भविष्यकाळ)

भविष्यकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे चालतात –

| पुरिस | एकवचन | अनेकवचन | 'पठ' - शिकणे | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरिस | एकवचन | अनेकवचन |
| उत्तमपुरिस | इस्सामि | इस्साम | उत्तमपुरिस | पठिस्सामि | पठिस्साम |
| मज्झिपुरिस | इस्ससि | इस्सथ | मज्झिपुरिस | पठिस्ससि | पठिस्सथ |
| पठमपुरिस | इस्सति | इस्सन्ति | पठमपुरिस | पठिस्सति | पठिस्सन्ति |

(लभ, गच्छ, नम, वस, कस इत्यादी धातू 'पठ' प्रमाणे चालतात.)



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

# सन्धी

एकापुढे एक येणारे जवळजवळचे वर्ण एकत्र जोडण्याच्या प्रकारास 'सन्धी' असे म्हणतात. पालिमध्ये तीन प्रकारचे सन्धी आहेत – १) स्वर सन्धी, २) व्यंजन सन्धी, ३) निग्गहित (अनुस्वार) सन्धी. पालित विसर्ग नसल्यामुळे विसर्ग सन्धी होत नाही.

## १- स्वर सन्धी

दोन स्वर एकापुढे एक असल्यास ते एकमेकांत मिळून जातात. पालि भाषेतील स्वरसन्धी विषयीचे काही प्रमुख नियम पुढील प्रमाणे आहेत.

(१) 'अ'पासून 'ऊ' पर्यंत स्वरापुढे सजातीय (म्हणजे त्याच प्रकारचा) स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल एक दीर्घ स्वर होतो.

| प्रकार | उदाहरण | सन्धी | प्रकार | उदाहरण | सन्धी |
|---|---|---|---|---|---|
| अ+अ | पन+अयं | पनायं | आ+अ | पादा+अपि | पादापि |
| आ+आ | तव्हा+आकुला | तव्हाकुला | इ+इ | उपद्दहन्ति+इति | उपद्दहन्तीति |
| इ+ई | नहि+ईदिसो | नहीदिसो | उ+उ | बहु+उपकारो | बहूपकारो |
| उ+ऊ | बहु+ऊसहन | बहूसहन | | | |

(२) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांचा सन्धी होताना क्वचित पहिल्या स्वराचा लोप होतो.

पुरिस+उत्तमो (= अ + उ) = पुरिसुत्तमो

निलानि+एकानि (=इ+ए) =निलानेकानि

तत्र+इमे (=अ+इ) = तत्रिमे

अज्ज+उपोसथो (= अ+उ) = अज्जुपोसथो

एसो+आवुसो (= ओ +आ) = एसावुसो

(३) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदाचा सन्धी होत असता क्वचित पुढच्या स्वराचा लोप होतो.

रुक्खो + अपि (=ओ+अ) = रुक्खोपि

देवो+अम्हि (=ओ+अ) =देवोम्हि

सो+अहं (=ओ+अ)= सोहं

सो+अपि (=ओ+अ) = सोपि

चत्तारो+इमे (=ओ+इ)= चत्तारोमे

(४) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदाचा सन्धी होत असता कधी कधी दोहोंपैकी एकाही स्वराचा लोप होत नाही.

कञ्ञा+इव (=आ+इ) = कञ्ञाइव

लता+इव (=आ+इ) =लताइव

(५) लोप झालेल्या स्वरापुढे 'इ' असेल तर त्याऐवजी 'ए' होतो आणि 'उ' असेल तर त्याचा 'ओ' होतो.

तस्स+इदं (=अ+इ) =तस्सेद

वात+इरितं (=अ+इ) = वातेरितं

वाम+उरू (=अ+उ)=वामोरू

वि+उदकं (=इ + उ) = वोदकं

(६) 'इ' (ऱ्हस्व-दीर्घ) अथवा 'उ' (ऱ्हस्व-दीर्घ) यांच्यापुढे इतर वर्ण आल्यास 'इ' चा 'य' आणि 'उ' चा 'व' होतो.

वि+आकतो (=अ+आ) = व्याकतो

इति + अस्स (=इ +अ) = इत्यस्स (इच्चस्स)

सु+आगतो (=उ+आ)= स्वागतं

बहु+आबाधो (=उ+आ) = बव्हाबाधो



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

## २- व्यंजन सन्धी

जेव्हा एक व्यञ्जन दुसऱ्या व्यञ्जनाबरोबर अथवा स्वराबरोबर मिळते तेव्हा त्याला व्यञ्जन सन्धी म्हणतात.

(१) जेव्हा एखाद्या स्वरापुढे पर-अक्षर हे जर व्यञ्जन असेल तर पूर्वी असलेला ऱ्हस्व स्वराचा दीर्घ स्वर होतो आणि दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर होतो –

सम्म+धम्मो (= अ+ध+अ) = सम्माधम्मो

खन्ति+परमं (= इ+प्+अ) = खन्तीपरमं

जायति+सोको (= इ+स्+ओ) = जायतीसोको

मुनि+चरे (=इ +च्+अ) = मुनीचरे

(२) स्वरापुढे व्यञ्जन आले असल्यास केव्हा केव्हा त्या व्यञ्जनाचे द्वित्व होते –

वि+गेहो (=इ+ग्+अ) = विग्गहो

प+गहो (=अ+ग्+अ) = पग्गहो

दु+कतं (=उ+क्+अ) = दुक्कतं

(३) 'ए' आणि 'ओ' च्या नंतर कोणताही वर्ण आल्यास 'ए' आणि 'ओ' चा 'अ' होतो -१-

याचके+आगते (=ए+आ) = याचकमागते

सो+सीलवा (=ओ+स्+इ) = ससीलवा

एस्सो+धम्मो (=ओ+ध्+अ) = एसधम्मो

## ३- निग्गहित (अनुस्वार) सन्धी

निग्गहिता(अनुस्वार)बरोबर स्वर अथवा व्यञ्जन मिळते तेव्हा त्याला निग्गहित सन्धी म्हणतात.

(१) काही वेळा निग्गहिताचा लोप होतो.

संं+रत्तो = सारतो

संं+रागो = सारागो

कथं+अहं = कथाहं

गन्तुं+कामो = गन्तुकामो

बुद्धानं+सासनं = बुद्धानसासनं

एव+अहं = एवाहं

(२) निग्गहिता (अनुस्वारा)पुढे आलेल्या स्वराचा काही वेळा लोप होतो.

त्वं+असि = त्वंसि

किं+इति = किंती

इदं+अपि= इदम्पि

अलं +इदानि = अलन्दानि

(३) जर निग्गहितानंतर 'य', 'एव' तसेच 'हि' हे शब्द आल्यास, निग्गहिताचा काही वेळा 'ञ्ञ' होतो. तसेच 'य' पुढे आल्यास पूर्वीच्या 'सं' शब्दावरील निग्गहिताचा 'ञ्ञ' होतो.

तं+एव = तञ्ञेव

तं+हि = तञ्हि

सं+यमो = सञ्ञमो

सं+यतो = सञ्ञतो

## नामरूपावली

### 'बुद्ध' - अकारान्त पुल्लिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | बुद्धो | बुद्धा | दुतिया | बुद्धं | बुद्धे |
| ततिया | बुद्धेन | बुद्धेहि, बुद्धेमि | चतुत्थी | बुद्धाय, बुद्धस्स | बुद्धानं |
| पञ्चमी | बुद्धा, बुद्धम्हा, बुद्धस्मा | बुद्धेहि, बुद्धेमि | छट्ठी | बुद्धस्स | बुद्धानं |
| सत्तमी | बुद्धे, बुद्धम्हि, बुद्धस्मिं | बुद्धेसु | आलपन | बुद्ध, बुद्धा | बुद्धा |

खालील पुल्लिंगी शब्द 'बुद्ध' नामधातूप्रमाणे चालतात. - नर, मनुस्स, पुरिस, मनुज, सुर, नाग, लोक, संघ, पुत्त, याचक, दारक, वाणिज, सुरिय



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

### ‘दुक्ख’ – अकारान्त नपुंसकलिंगी शब्द

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | दुक्खं | दुक्खा, दुक्खानि | दुतिया | दुक्खं | दुक्खे, दुक्खानि |
| ततिया | दुक्खेन | दुक्खेहि, दुक्खेभि | चतुत्थी | दुक्खाय, दुक्खस्स | दुक्खानं |
| पञ्चमी | दुक्खा, दुक्खम्हा, दुक्खस्मा | दुक्खेहि, दुक्खेभि | छट्ठी | दुक्खस्स | दुक्खानं |
| सत्तमी | दुक्खे, दुक्खम्हि, दुक्खस्मिं | दुक्खेसु | आलपन | दुक्खं | दुक्खा, दुक्खानि |

खालील शब्द ‘दुक्ख’ शब्दाप्रमाणे चालतात –

वन, धन, गाम, पाप, उदक, उय्यान, सोत, ञान

### ‘साखा’ – आकारान्त स्त्रीलिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | साखा | साखा, साखायो | दुतिया | साखं | साखा, साखायो |
| ततिया | साखाय | साखाभि, साखाहि | चतुत्थी | साखाय | साखानं |
| पञ्चमी | साखाय | साखाहि, साखाभि | छट्ठी | साखाय | साखानं |
| सत्तमी | साखायं, साखाय | साखासु | आलपन | साखे | साखा, साखायो |

खालील शब्द ‘साखा’ शब्दाप्रमाणे चालतात –

सुजाता, विमला, अम्मा, मेत्ता, गाथा, तण्हा, कञ्ञा, भरिया

### ‘मुनि’ – इकारान्त पुल्लिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | मुनि | मुनी, मुनयो | दुतिया | मुनिं | मुनी, मुनयो |
| ततिया | मुनिना | मुनीहि, मुनीभि | चतुत्थी | मुनिनो, मुनिस्स | मुनीनं |
| पञ्चमी | मुनिनो, मुनिम्हा, मुनिस्मा | मुनीहि, मुनीभि | छट्ठी | मुनिनो, मुनिस्स | मुनीनं |
| सत्तमी | मुनिम्हि, मुनिस्मिं | मुनिसु, मुनीसु | आलपन | मुनि, मुनी | मुनि, मुनयो |

हे शब्द ‘मुनि’ शब्दाप्रमाणे चालतात – गण्ठि, गिरी, कपि, अहि, मसि, सालि, अग्गि, निधि

### ‘भिक्खु’ – उकारान्त पुल्लिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | भिक्खु | भिक्खु, भिक्खवो | दुतिया | भिक्खुं | भिक्खु, भिक्खवो |
| ततिया | भिक्खुना | भिक्खुहि, भिक्खुभि | चतुत्थी | भिक्खुनो, भिक्खुस्स | भिक्खुनं |
| पञ्चमी | भिक्खुना,भिक्खुम्हा,भिक्खुस्मां | भिक्खुहि, भिक्खुभि | छट्ठी | भिक्खुस्स | भिक्खुनं |
| सत्तमी | भिक्खुम्हि, भिक्खुस्मिं | भिक्खुसु | आलपन | भिक्खु | भिक्खु, भिक्खवे, भिक्खवो |

पुढील शब्द ‘भिक्खु’ शब्दाप्रमाणे चालतात – सेतु, गुरु, भानु, पितु, मेरु, मधु, केतु, बाहु.



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

# सब्बनामो (सर्वनाम)

### 'अम्ह' - प्रथम पुरुषवाचक सर्वनाम

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | अहं | मयं, अम्हं, नो | दुतिया | मं, ममं | अम्हाकं, अम्हे, नो |
| ततिया | मया, मे | अम्हेहि, अम्हेभि, नो | चतुत्थी | मम, मय्हं, ममं, मे | अम्हं, अम्हाकं |
| पञ्चमी | मया, मे | अम्हेहि, अम्हेभि | छट्ठी | मम, मय्हं, ममं | अम्हं, अम्हाकं |
| सत्तमी | मयि | अम्हेसु | | | |

### 'तुम्ह' - द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | त्वं, तुवं | तुम्हे, वो | दुतिया | त्वं, तुवं, तं, तवं | तुम्हाकं, तुम्हे, वो |
| ततिया | तया, त्वया, ते | तुम्हेहि, तुम्हेभि, वो | चतुत्थी | तव, तुय्हं, तुम्हं, ते | तुम्हाकं, वो |
| पञ्चमी | तया, त्वया, ते | तुम्हेहि, तुम्हेभि, वो | छट्ठी | तव, तुय्हं, तुम्हं, ते | तुम्हाकं, वो |
| सत्तमी | त्वयि, तयि | तुम्हेसु | | | |

'अम्ह' व 'तुम्ह' या सर्वनामांचे रूप तिन्ही लिङ्गात समान असतात.

### 'त' = तो तृतीय पुरुषवाचक सर्वनाम

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | सो | ते, ने | दुतिया | तं, नं | ते, ने |
| ततिया | तेन, नेन | तेहि, तेभि, नेहि, नेभि | चतुत्थी | तस्स, अस्स, नस्स | तेसं, तेसानं, नेसानं |
| पञ्चमी | तम्हा, अम्हा, तस्मा | तेहि, तेभि | छट्ठी | तस्स, अस्स, नस्स | तेसं, तेसानं, नेसानं |
| सत्तमी | तम्हि,अम्हि,तस्मिं,अस्मिं | तेसु | | | |

### 'त' = ती, तृतीय पुरुषवाचक स्त्रीलिंगी (इत्थिलिङ्ग)

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | सा | ता,ताओ, ना,नाओ | दुतिया | तं, नं | ता,तायो,ना,नायो |
| ततिया | ताय, नाय, तस्सा,तिस्सा | ताहि, ताभि, नाहि, नाभि | चतुत्थी | तस्सा, अस्सा,नाय,तिस्सा | तासं,आसं,तासानं |
| पञ्चमी | ताय, नाय, तस्सा, तिस्सा | ताहि, ताभि, नाहि, नाभि | | तिस्साय,तस्साय,ताय | |
| छट्ठी | तस्सा, अस्सा, नाय, तिस्सा, तिस्सायु, तस्साय, नाय | तासं, आसं, तासानं | सत्तमी | तिसं,तस्स,अस्सं,ताये, तस्मा,तिस्सा | तासु |

### 'त' = ते, तृतीय पुरुषवाचक नपुंसकलिंगी

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| पठमा | तं, नं | ते, ने, तानि, नानि | दुतिया | तं, नं | ते, ने, तानि, नानि |

(टीप - इतर विभक्तींची रूपे 'त' पुल्लिंगी प्रमाणे होतात.)

★ ★ ★



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

# परिशिष्ट - ३

## पालिभाषेचे महत्त्व

अडीच हजार वर्षांपूर्वी भारतामध्ये बोलली जाणारी सर्वसामन्यांची भाषा पालि अर्थात मागधी होती. मागधी भाषेला 'पालि' हे नाव इ.स. पाचव्या शतकात प्रसिद्ध अट्ठकथाकार आचार्य बुद्धघोषथेर यांनी दिले आहे. या भाषेने बुद्धवचनाचे पालन केले (पा पालेति रक्खति ति पालि) म्हणून ती पालि, असा तिचा थोडक्यात अर्थ झाला.

भारतामध्ये आणि भारताबाहेरील अनेक देशांच्या भाषेची जननी म्हणजे आई, पालिभाषाच आहे. म्हणून तर मराठी असो वा हिन्दी, बंगाली वा गुजराती ह्या सर्व आजच्या भाषांमध्ये पालि शब्द भरपूर आढळतात.

पालि ही भारतातील मूळ भाषा असली तरी आपण पालिभाषेची ओळख विसरलो होतो. परंतु आपल्या शेजारच्या बौद्ध राष्ट्रांनी बुद्धाचा धम्मच नव्हे तर त्या धम्माचे रक्षण करणारी भाषादेखील सांभाळली आणि एकोणिसाव्या शतकामध्ये इंग्रजी अभ्यासकांच्या मदतीने पालिभाषा पुन्हा भारतात आली.

पालि ही एक स्वतंत्र भाषा आहे, पण दुर्दैवाने पालि ही प्राकृत भाषेचेच एक अंग आहे असे समजून सुरुवातीला पालिभाषेचा अभ्यास झाल्यामुळे पालिभाषेचे थोडे नुकसान झाले. पण आता जगभरच्या विद्वानांनी मान्य केले की, पालिभाषा ही एक स्वतंत्र भाषा असून तिचे स्वतंत्र व्याकरण आहे. कुठल्याही पुरातन वा नव्या भाषेचे गुण व आवश्यकता पालिभाषा पूर्ण करते. म्हणून पालि ही स्वतंत्र भाषा तर आहेच शिवाय इतर भाषांच्याही पुढे जाऊन पालिभाषेचे काही विशिष्ठ वैशिष्ट्ये आहेत.

पालिभाषेत फक्त बुद्धाचा धम्म आहे आणि धम्माच्या अनुषंगाने येणारे अनुभव आहेत. असे असल्यामुळे पालिभाषेत कल्पनांना, अंधश्रद्धा व कल्पनाविलासांना बिलकूल वाव नाही, आहेत ते फक्त सत्य आणि सत्यावर आधारित विद्वानांचे अनुभव.

पालिभाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पालि अभ्यासाचे तीन अंग - ज्याला परियत्ति, पटिपत्ति व परिवेदन असे म्हणतात. पालिभाषेतील कुठलाही शब्द तिन्ही प्रकारे जोपर्यंत जाणत नाही तोपर्यंत पालिभाषेचे ज्ञान पूर्ण होत नाही, असे मानण्यात येते.

परियति म्हणजे ऐकून, वाचून, शब्दाचा अर्थ समजून घेणे. पटिपत्ति म्हणजे त्यावर चर्चा, विचार-विमर्श करणे आणि पटिवेदन म्हणजे त्या शब्दांचा प्रत्यक्ष अनुभव घेणे. उदाहरणार्थ दुक्खाचा अनुभव. आगीचा चटका लागतो. बाळा, आगीपासून दूर रहा असे सांगणे म्हणजे चटका आणि त्यापासून होणारा त्रास वा दुक्ख हे तो लहान मुलगा नुसता ऐकत असतो. आगीचा चटका व त्याचे दुक्ख ह्यावर तो इतरांशी बोलतो, चर्चा करतो पण नेमका चटका काय असतो ह्याची त्याला जाणीव नसते. त्रास होतो ही ती ऐकीव माहिती तो बरच सांगू शकतो, पण जेव्हा खरोखरीच आगीचा चटका बसतो तेव्हा चटक्याच्या दुक्खाचे खरे ज्ञान होते त्याची अनुभूती मिळते आणि हेच खरे अनुभवाचे ज्ञान असते.

'पालि'मधील शब्दांची अशी तिन्ही अंगांनी जोपर्यंत अनुभूती येत नाही तोपर्यंत पालि शब्दांचे संपूर्ण ज्ञान होत नाही.

आचरिय परंपरेने पालिभाषेतील बुद्धाचे वचन स्मरणात ठेवूनच पिढ्यांपिढ्या सांभाळण्यात आले आहे. बुद्धवचनांची शुद्धता आणि धम्माचे शुद्ध स्वरूप पुढच्या पिढीपर्यंत योग्य तऱ्हेने पोहोचविणे हे प्रत्येक गुरु-शिष्याचे काम होते, तरीसुद्धा ही शुद्धता सांभाळली गेली की नाही ह्याची पडताळणी संगिती किंवा संगायन घेऊन करण्यात येत असे.

आतापर्यंत झालेल्या सहा संगितींमध्ये याची शहानिशा होऊन पालिभाषेतील बुद्धवचनाची शुद्धता पटविण्यात आली आहे.

चौथ्या धम्मसंगितीत हे बुद्धवचन प्रथमच श्रीलंकेत लिहिण्यात आले आणि जसे बोलले जायचे तसेच लिहिले गेले म्हणून आज आपल्याला वाचताना बऱ्याचदा ओळींच्या ओळी पुन्हा पुन्हा वाचाव्या लागतात, शब्द पुन्हा पुन्हा येतात कारण ती, ते शब्द स्मरणात ठेवण्याची एक पद्धत होती.

'पालि'मधील संपूर्ण बुद्धवचनाला तिपिटक म्हणतात. सर्वसाधारणपणे त्याचा अर्थ तीन पिटके किंवा तीन टोपल्या (पेटारे) ह्या अर्थी होतो. पण आपणाला माहीत आहे की, पहिल्या धम्मसंगितीमध्ये जेव्हा तिपिटकाचे संकलन झाले तेव्हा ते मौखिक स्वरूपात होते. सगळे तिपिटक स्मरणात असल्यामुळे टोपलीत काय ठेवले असावे? तर विद्वानांचे असे मत आहे की, पिटक ह्या शब्दाचा अर्थ त्या काळात धम्माचे ज्ञान किंवा धार्मिक साहित्य ह्या अर्थाने करण्यात येत होता.

तिपिटकाव्यतिरिक्त पालिभाषेत तिपिटकावर लिहिलेल्या अट्ठकथा, अट्ठकथांवर लिहिलेल्या टिका, अनुटिका वगैरे असे बुद्ध आणि त्यांच्या धम्माशी संबंधित प्रचंड साहित्य आहे.



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

हे साहित्य फक्त भारतातीलच नव्हे तर बुद्धाचा धम्म ज्या ज्या राष्ट्रांमध्ये गेला तिथे निर्माण झालेले आहे. श्रीलंकेची भाषा 'सिंहली' असली, ब्रह्मदेशाची भाषा 'बरमी' असली तरी बुद्धवचनाची भाषा पालिबद्दल तेथील लोकांना इतका आदर आहे की त्यांनी सर्वांनी पालिभाषा शिकून त्याच भाषेत धम्मावर लिखाण केले. 'वंस साहित्य' हे त्यांच देशांचे पालिभाषेतील साहित्य होय. म्हणून भारतातून विसरलो असलो तरी पालि साहित्य आणि पालिभाषा अडीच हजार वर्षांपासून आजपर्यंत लिहिली गेली आहे.

ह्या राष्ट्रांमध्ये पालिभाषेत लिहिलेच जात नाही तर भिक्खु आणि अभ्यासकांची ती संभाषणाची भाषा आहे. श्रीलंकेतील वा ब्रह्मदेशातील भिक्खू वा अमेरिकेतील वा जर्मन देशातील अभ्यासक एकमेकांशी 'पालि'भाषेत संवाद करू शकतात. म्हणून पालिभाषेला आज आंतरराष्ट्रीय भाषेचा दर्जा प्राप्त होत आहे. आपणदेखील पालिभाषा शिकून आंतरराष्ट्रीय संवादात सहभागी होऊ शकतो.

पालिभाषेतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पालिभाषेत असलेले 'नवाङ्गसत्थुसासन' म्हणजे नऊ अंगांनी युक्त बुद्धांची शिकवण. साधारणपणे अभ्यासल्या जाणाऱ्या इतर भाषांमध्ये गद्य, पद्य, नाटक असे साहित्याचे प्रकार आढळतात. पालिभाषेत बुद्धांनी नऊ प्रकारे धम्म सांगितला आहे. ते म्हणजे सुत्तं, गेय्यं, वेय्याकरणं, गाथा, उदानं, इतिवुत्तकं, जातकं, अब्भुतधम्मं आणि वेदल्लं.

बुद्धांनी धम्म सामान्य लोकांच्या भाषेत सांगितला, पण सामान्य बोलीभाषेतील पालि शब्दांना त्यांनी खूप अर्थ दिले, नवीन संदर्भ दिले, एक नवीन ताकद दिली जी अनुभवता येऊ शकते म्हणून पालिभाषाच शिकावी लागते. इतर भाषांमध्ये भाषांतर केले तर त्या भाषेची, शब्दांची ताकद भाषांतरित शब्दांत उतरत नाही. उदाहरणार्थ धम्म. धम्म ह्या शब्दाला खूप अर्थ आहेत. धम्म कधी बुद्धाच्या शिकवणीला म्हणतात, तर कधी धम्म हा शब्द निसर्गाच्या नियमाला वा वैज्ञानिक सत्याला म्हटले जाते, मनातील विचारांनादेखील धम्म म्हणतात, मग अशा विविध अर्थांच्या शब्दाचे फक्त धम्म असे भाषांतर योग्य होत नसल्यामुळे जगभरातील कुठल्याही भाषेत पालि शब्द पालितच ठेवण्यात येतात. म्हणून पालि भाषेतच मूळ बुद्धवचन शिकणे सोपे वा सोयिस्कर तर आहेच शिवाय फायद्याचे आहे.

बुद्ध हे जगातील सर्वश्रेष्ठ शिक्षक आहेत. विद्यार्थ्यागणिक शिकविण्याची पद्धत वेगळी. शेतकऱ्याला शेतीच्या भाषेत तर संगीतकाराला संगीताच्या भाषेत धम्म शिकवायचे. उदाहरणे देऊन, उपमा देऊन रोजच्या जीवनातील प्रसंग सांगून, गोष्टी सांगून धम्म शिकविण्याचे हजारो उदाहरणे पालिभाषेत आहेत.

समाजातील प्रत्येक स्थरातील माणसांचे मग ते पुरुष असो वा स्त्री, लहान मुले असोत वा म्हातारे, तथाकथित ब्राह्मण असो वा शूद्र, राजा असो वा याचक, भिक्खू असो वा उपासक प्रत्येकाचे दुक्ख दूर करताना बुद्धांनी अनेक गोष्टी सांगितल्या आहेत, ज्या पालिभाषेत सुरक्षित आहेत. पालिभाषा शिकली की हा खजिना आपल्या समोर उघडतो आणि संपूर्ण आयुष्यभर पुरेल एवढे ज्ञान त्यातून घेता येते.

पालिभाषेने राष्ट्रीय एकात्मतेचा मूळ स्त्रोत सांगितला आहे. पञ्ञा, सील, करुणा व मेताभावनेचे अपूर्व मिश्रण या भाषेत सामावलेले आहे. पालिभाषा मधूर व समजण्यास सोपी आहे. तसेच या भाषेला वैचारिक स्वातंत्र्याचा, लोकशाहीचा उदात्त वारसा लाभलेला आहे.

बुद्धाने मानवतेचा पुरस्कार करताना त्यामध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय व नीतिमत्ता यांचा योग्य आग्रह धरलेला आहे. त्यामुळे पालि साहित्यात फक्त गोष्टीच नाहीत तर अडीच हजार वर्षांपूर्वीच्या भारताचा ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, नैतिक आणि सांस्कृतिक अभ्यास करण्याची साधने आहेत. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र, वैद्यकशास्त्र, कला आणि स्थापत्य भरून आहे.

जगभरचे विद्वान पालिभाषा शिकण्यासाठी उत्सुक आहेत कारण जगाची उत्पत्ती कशी झाली इथपासून खोटे का बोलू नये ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे ह्या भाषेत दिलेली आहेत.

पालिभाषा तिच्या शुद्ध स्वरूपात शिकून त्यातले ज्ञान आत्मसात करून एक सुजाण व्यक्ती तर बनतोच शिवाय आंतरराष्ट्रीय संवादाचे एक दालन उघडे करतो. ''पालिभाषा शिका आणि आयुष्यात पडणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर त्यात शोधा.''

★ ★ ★



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

## इयत्ता - नववी

# तोंडी - परीक्षा

**विषय - पालि (संपूर्ण) सहामाही आणि वार्षिक** **गुण २०/२०**

सूचना - १) १५-१५ विद्यार्थ्यांचा एक गट तयार करावा.
२) तोंडी परीक्षेची काठिण्यपातळी क्रमबद्ध असावी.
३) तोंडी परीक्षेतील उत्तीर्णता ही स्वतंत्र असेल.

### (१) श्रवण किंवा श्रुतलेखन गुण - ०५

एका-एका गटाला पाच ओळींचे अपठितातील पालि शुद्धलेखन देणे.

### (२) प्रकट वाचन गुण - ०५

विद्यार्थ्यांकडून पाठ्य घटकांच्या संदर्भ ग्रंथातील दोन गाथा अथवा लहान उतारा वाचून घ्यावा.

### (३) भाषण गुण - ०५

प्रत्येक विद्यार्थ्याला ''मम पाठसाला/उय्यानं/कस्सको/रुक्खो'' इत्यादी विषयांपैकी एखादया विषयावर सलग चार/पाच वाक्ये पालित बोलण्यास सांगावे.

### (४) संभाषण गुण - ०५

विद्यार्थ्यांना पालित संभाषण करता यावे त्यासाठी त्याला पालिभाषेत ''तव नामं किं अत्थि / तव पाठसालायस्स नामं किं अत्थि / त्वं किं वग्ग मज्झे सिक्खस?'' अशाप्रकारचे प्रश्न विचारून त्यांच्याकडून त्यांची पालिभाषेत उत्तरे वदवून घ्यावीत.

★★★



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

# प्रश्नपत्रिकेचा आराखडा

## इयत्ता नववी विषय - पालि (संपूर्ण)

वेळ - ३ तास | गुण - ८०

**प्र. १.** **(अ)** कोणत्याही <u>**तीन**</u> उताऱ्यांचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा. **(गद्य)** (१५)

१) २) ३)

४) ५)

**(ब)** कोणत्याही <u>**दोन**</u> उताऱ्यांचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा. **(पद्य)** (०८)

१) २)

३) ४)

**प्र. २.** **(अ)** 'गट एक' मधील व 'गट दोन' मधील प्रश्नांची उत्तरे स्वीकृत माध्यमातून लिहा. (०८)

**गट-१** - गद्यावर आधारित <u>**दोन**</u> प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) २) ३)

**गट-२** - पद्यावर आधारित <u>**दोन**</u> प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) २) ३)

**(ब)** खालीलपैकी कोणत्याही <u>**तीन**</u> गाथा शुद्ध व पूर्ण करून लिहा. (०६)

१) २)

३) ४)

**प्र.३.** पुढीलपैकी कोणत्याही <u>**एका**</u> विषयावर पालित <u>**पाच**</u> ओळींचा निबंध लिहा. (०५)

१) २)

३) ४)

**अथवा / OR / किंवा**

पालित भाषांतर करा.

(<u>**पाच**</u> ओळींचा संमत माध्यमातील उतारा - इंग्रजी/हिन्दी/मराठी)

**प्र. ४.** खालिल <u>**पाच**</u> वाक्यांची घटनाक्रमानुसार फेरमांडणी करा. (०५)

१) २) ३) ४)

५) ६) ७)

**अथवा / OR / किंवा**

रिकाम्या जागा भरून कथा/परिच्छेद पूर्ण करा.

(सुमारे <u>**पाच**</u> ओळी द्याव्यात.)

**प्र. ५.** (अ) कोणत्याही <u>**एका**</u> उताऱ्याचे स्वीकृत माध्यमातून भाषांतर करा. (अपठित पालि उतारे) (०५)

१) २) ३)

(ब) खालील कोणत्याही <u>**दोन**</u> टिपांवर पर्याय निवडा. (०४)

१) २) ३) ४)

५) ६) ७) ८)



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

प्र. ६. स्थुलवाचनावर आधारित कथात्मक किंवा वर्णनात्मक प्रश्न विचारावे. (०४)

प्र. ७. कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे पालित लिहा. (आठ प्रश्न गद्य-पद्यावर आधारित असावेत.) (०५)

१) २)
३) ४)
५) ६)
७) ८)

**अथवा / OR /किंवा**

पुढीलपैकी **पाच** अव्यय/उपपद विभक्तींचा वाक्यात उपयोग करा.

१) २)
३) ४)
५) ६)
७) ८)

प्र. ८. खालीलपैकी कोणतेही **पाच** उपप्रश्न सोडवा. (१५)

(अ) रूप ओळखा. (कोणतेही **तीन**) (०३)

१) २) ३) ४) ५)

(ब) पुढीलपैकी कोणतेही **तीन** समास ओळखा. (०३)

१) २) ३) ४) ५)

(क) कोणतेही **तीन** संधी करा. (०३)

१) २) ३) ४) ५)

(ड) कोणत्याही **तीन** पालि शब्दांचे माध्यम भाषेत अर्थ सांगा. (०३)

१) २) ३) ४) ५)

(इ) कोणत्याही **तीन** जोड्या जुळवा. (०३)

१) २) ३) ४) ५)

(फ) माध्यम भाषेत शब्दांचे अर्थ सांगा. (कोणतेही **तीन**)२ (०३)

१) २) ३) ४) ५)

★★★



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

गज्जो विभागो - पठमो पाठो ।

# तिरतन गुणानि ।

सम्बोधिप्राप्तीनंतर तथागतांनी 'चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय बहुजन सुखाय' असा भिक्खू-समूहाला फार मोठा संदेश देत सतत ४५ वर्षे विचरण केले. पालि तिपिटकातील विनयपिटक या ग्रंथामध्ये याचा उल्लेख प्राप्त होतो.

तत्कालीन भारतीय समाजालाच नव्हे तर संपूर्ण जगाला आपल्या बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक तसेच शैक्षणिक नीतिमूल्यांद्वारे फार मोठी देणगी दिलेली आहे. बुद्धकालीन श्रमण - ब्राह्मण - परिव्राजकांमध्ये विविध विषयांवर परस्परांमध्ये चर्चा होत असतांना त्यांचे जेव्हा एकमत होत नव्हते, त्यांच्यामध्ये काही शंका उपस्थित होत होत्या अशावेळी आपल्या शंका निरसनासाठी ते तथागताकडे येत असत. तत्पूर्वी ते बुद्ध, धम्म आणि सङ्घ या तीन रत्नांच्या कल्याणकीर्तीची प्रशंसा करीत असत, त्याचेच वर्णन या पाठामध्ये आलेले आहे.



इतिपि सो भगवा अरहं, सम्मासम्बुद्धो, विज्जाचरण - सम्पन्नो, सुगतो, लोकविदू, अनुत्तरो , पुरिसदम्मसारथि, सत्था देवमनुस्सानं बुद्धो भगवा' ति ।

स्वाक्खातो भगवता धन्मो सन्दिट्ठिको अकालिको एहिपस्सिको ओपनेय्यिको पच्चत्तं वेदितब्बो विञ्ञूही' ति ।

सुप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, उजुप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, ञायप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, सामीचिप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो यदिदं चत्तारि पुरिसयुगानि, अट्ठ पुरिसपुग्गला, एस भगवतो सावकसङ्घो आहुनेय्यो, पाहुनेय्यो, दक्खिणेय्यो, अञ्जलिकरणियो अनुत्तरं पुञ्ञक्खेत्तं लोकस्सा' ति ।

(*Dr. Babasaheb Ambedkar - Writing and Speeches, Vol. 16 - आवश्यक बदल करून*)

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**भगवा** (पुं.) - तृष्णामुक्त, भगवन्त
**सम्मासम्बुद्धो** (पुं.) (सम्मा +सम्बुद्ध) - संपूर्ण ज्ञानी
**सुगतो** (वि.) - चांगल्या गतीला प्राप्त झालेला
**लोकविदू** (वि) (लोक +विद्) - बुद्धाच्या ठिकाणी असलेले गुणवाचक विशेषण
**सत्था** (पुं.प.वि.) - शास्ता, तथागत
**बुद्धो** (वि.) - (बुध) ज्ञानी, बुद्धिमान
**धम्मो** (पुं.) - धम्म, सिद्धान्त, स्वभाव, सत्य, सदाचार
**सन्दिट्ठिको** - सन्दिट्ठिक (वि.) - दृष्टिस पडणारा, दिसून येणारा
**अरहं** (पुं.) - अर्हत, जीवनमुक्त
**विज्जाचरणसम्पन्नो** (नपुं.) (विज्जू +आचरण) - विद्या आणि आचरणाने युक्त
**अनुत्तर** (नपुं.) - सर्वोत्तम
**पुरिसदम्मसारथी** (अकुशल मार्गाला लागलेल्या) - पुरुषांचे दमन करणारा सारथी
**स्वाक्खात** (वि.) - (सु-आख्यात) - चांगल्याप्रकारे व्याख्या केलेला
**अकालिको** (अ+कालिक) - तात्काळ, वेळीच



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

एहिपस्सिक - जो धम्म सर्वांना सूचित करतो की, या आणि परीक्षा करून पहा / या - अनुभवा
वेदितब्बो (विद्) - जाणणे
सुपटिपन्न (वि.) - सुमार्गावर आरूढ
उजु (वि.) - सरळ
सामीचि - पटिपन्न (वि.) - उचित मार्गावर आरूढ
यदिदं (वि.) - (यद्+इदं) - म्हणजे
पुग्गल (पुं.) - पुद्गल, व्यक्ती
अट्ठ (वि.) - आठ
पाहुनेय्यो (वि.) - आदरातिथ्य करण्यायोग्य
अञ्जलिकरणियो - हात जोडण्यायोग्य
ओपनयिको (वि.) (उपनय+इक) - जवळ नेणारा.
पच्चत्तं (क्रि.वि.) - पृथक-पृथक, व्यक्तिगत
विञ्ञु (वि.) - बुद्धिमान, विद्वान, ज्ञाता
सावकसङ्घ (पुं.) - शिष्यांचा समूह
ञायपटिपन्न (वि.) - चांगल्या मार्गाला नेणारा, न्याय्य मार्गाला नेणारा
चत्तारि - चार
युग (नपुं.) - जोडी
आहुनेय्यो (वि.) - भेट देण्यायोग्य
दक्खिणेय्यो (वि.) - दान देण्यायोग्य

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) 'बुद्ध' म्हणजे काय ?

(२) 'धम्म' म्हणजे काय ?

(३) 'सङ्घ' म्हणजे काय ?

२. **खालील पालि प्रश्नांची पालिभाषेतच उत्तरे लिहा.**

(१) बुद्धस्स धम्मो किदिसो होति ?

(२) बुद्धस्स सङ्घो किदिसो होति ?

**टिपण**

- बुद्ध, धम्म आणि सङ्घ या शब्दांची ओळख त्याच्या गुण कार्यावरून करून देणे.
- बुद्ध, धम्म आणि सङ्घ हे 'तिरतन' सर्व रत्नांमध्ये मौल्यवान कसे आहे ते जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

★ ★ ★



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

## दुतियो पाठो ।

# अञ्ञमञ्ञं सल्लपनं ।

प्रस्तुत पाठाचा हेतू विद्यार्थ्यांमध्ये पालिभाषेतून संवाद-कौशल्य विकसित व्हावे हा आहे.




**धम्मपालो** – त्वं पालिभासा जानसि ?

**रट्ठपालो** – अहं थोकं थोकं जानामि ।

**धम्मपालो** – त्वं पालिभासा सल्लपितुं सक्कोति ?

**रट्ठपालो** – आम, थोकं थोकं सल्लपितुं सक्कोमि ।

**धम्मपालो** – त्वं नामं किं ?

**रट्ठपालो** – ममं नामं रट्ठपालो ।

**धम्मपालो** – त्वं कुहिं वससि ?

**रट्ठपालो** – अहं नागपूर नगरे दिक्खाभूमिस्स समिपे वसामि ।

**धम्मपालो** – तुय्हं भातुभगिनि किं करोन्ति ?

**रट्ठपालो** – एको वाणिजो, दुतियो कस्सको, एका भगिनि उग्गण्हाति ।

**धम्मपालो** – भगिनि, त्वं पाठसालाया नाम किं अत्थि ?

**भगिनि** – मम पाठसालाय नामं महामाया कञ्ञा माज्झमिकं विज्जालयो अत्थि ।

**धम्मपालो** – त्वं किं कम्मं कातुं इच्छति ?

**भगिनि** – अहं पालि भासाय अज्झायका भवितुं इच्छामि ।

**धम्मपालो** – साधु, साधु, साधु ।

### सद्दत्थ (शब्दार्थ)

**त्वं** - तु
**अहं** (प्र.पु. सर्वनाम) - मी
**भवितुं** (भू धातू तुमन्त) - होण्याची शक्यता/इच्छा
**कुहि** - कुठे
**समिप** - जवळ

**अज्झायका** - शिक्षिका
**अत्थि** - आहे
**मय्हं** - आम्ही
**सक्कोति** - शक्य
**कांतु** - ('कर' धातू, तुमन्त) - करण्यासाठी



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) मुलीच्या शाळेचे नाव काय ?

(२) ती कोणते कार्य करू इच्छिते ?

(३) रट्ठपाल कोठे राहतो ?

**२. खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) त्वं कुंहि वससि ?

(२) त्वं भातुभगिनि किं करोति ?

(३) विज्जालयं नाम किं अत्थि ?

(४) त्वं किं कम्मं कातुं इच्छति ?

**३. रिकाम्या जागा भरा.**

(१) अज्झायको - - - - इच्छामि । (भवितुं)

(२) दिक्खाभूमिस्स - - - - वसामि । (समिपे)

**टिपण**

- पालिभाषा संवाद-क्षमता वाढविणे.
- पालिभाषा प्राचीन असली तरी तिचा दैनंदिन जीवनात उपयोग करणे. लहान-लहान पालि-वाक्य तयार करणे.

★★★



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

तृतियो पाठो ।

# तथागतो सम्मासम्बुद्धो ।

प्रस्तुत पाठात तथागत सम्यक सम्बुद्धाचे जीवन-चरित्र थोडक्यात दिले असून त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे वर्णन केले आहे.

---

अम्हाकं तथागतो सम्मासम्बुद्धो । तस्स नाम सिद्धत्थो अहोसि । सो कपिलवत्थु जनपदे लुम्बिनिवने जातो । तस्स पिता सुद्धोदनो महाराजा । तस्स माता महामाया । सा सिद्धत्थस्स बालवये मीयति । बालको सिद्धत्थो विचक्खणो च विचारको च होति । सो सिद्धत्थो सोलसवस्सकाले यसोधरा नाम कञ्ञं वारेसि । सा यसोधरा सीलसम्पन्ना अहोसि । एकूनतिंसतिमे वस्से ते राहुलनामं पुत्तरतनं अलभिंसु ।

तदहेव सिद्धत्थ बालको संसारे असारंभावं पस्सि । सो पञ्चकामा सम्पत्तियो पहायि । तेन रत्तिया मज्झिमे यामे महाभिनिक्खमनं कतं । अनन्तर सिद्धत्थो अनोमा नदीतीरं गतो । ततो सो पब्बजि । ततो अनन्तरं एके रुक्खमूले निसीदि । ततो छब्बस्सानि अनन्तरं बोधिगयायं बोधिरुक्खमूले अभिसम्बुज्झि ।

सो सम्मासम्बुद्धो पञ्चचत्तालीसवस्सानि लोककल्याणायं सद्धम्मं अदेसयि । तदनन्तरे सम्मासम्बुद्धो कुसिनारायं महापरिनिब्बायि ।

## सद्दत्थ (शब्दार्थ)

तथागत (वि.) - बुद्ध
अम्ह (सर्वनाम) - आपला
सो (सर्वनाम) - तो
पहायि (क्रि.) - सोडून देणे
महाभिनिक्खमन (नपुं.) - अभिनिष्क्रमण करणे
मीयति (क्रि.) - मरण पावणे
विचक्खण (पुं.) - बुद्धिमान
च (अव्यय) - आणि
विचारक (पुं.) - विचार करणारा
होति (क्रि.) - होता
सोलसवस्सकाले - सोळाव्या वर्षी
कञ्ञा (स्त्री.) - कन्या, मुलगी
पञ्चचत्तालीसवस्स (वि.) - पंचेचाळीस वर्षे
अदेसयि - उपदेश केला
कुसिनारा (नाम) - कुशीनारा नावाचे नगर

सम्मासम्बुद्ध (वि.) - संपूर्ण ज्ञानी
पञ्चकामसम्पत्ति (पुं.) - पंचेंद्रियांची भोगवासना व संपत्ती
जात (पुं.) - जन्मला
तस्स - त्याचा
सा (स्त्री. सर्वनाम) - ती
गतो (धा.वि.) - गेला
ततो (अव्यय) - नंतर
पब्बजा - प्रव्रजित होणे
निसीदि (क्रि.) - बसणे
छब्बस्सानि - सहा वर्षे
अभिसम्बुज्झि - बुद्धत्वाला प्राप्त होणे
वारेसि (क्रि.) - विवाह झाला
सीलसम्पन्न (वि.) - शीलवान, सदाचारी
अहोसि (क्रि.) - होणे
एकूनतिंसतिमे - एकोणतीस



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

**वस्स** (नपुं./पुं.) - वर्ष, साल
**महापरिनिब्बयि** (क्रि.) - महापरिनिर्वाणाला प्राप्त होणे, मृत्यू पावणे
**पस्स** (मूळ धातू दिस, क्रि.) - जाणणे, ओळखणे, बघणे
**अलभिंस** (क्रि.) - प्राप्त झाला
**तदहेव** (नपुं.) - त्याच दिवशी
**असारभाव** (वि.) - सारहीन भाव

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) सिद्धार्थाचा जन्म कुठे झाला ?
(२) सिद्धार्थाच्या आईचे नाव काय आहे ?
(३) तथागतांनी सम्बोधि कुठे प्राप्त केले ?
(४) तथागताचे महापरिनिर्वाण कोठे झाले ?

**२. जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| १) सो कपिलवत्थु जनपदे | १) तस्स माता महामाया । |
| २) तस्सा पिता सुद्धोदन | २) च विचारकोच होति । |
| ३) बालको सिद्धत्थो विचक्खणो | ३) लुम्बिनीवने जातो । |
| | ४) पुत्तरतनं अलभिंसु । |

**टिपण**

- सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या ऐतिहासिक जीवन-चरित्राचा परिचय करून देणे.
- चिकित्सकवृत्ती, त्यागमय आदर्श जीवन व बुद्धकालीन प्राचीन स्थळांचा परिचय करणे.

★ ★ ★



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

चतुत्थो पाठो ।

# सुजला सुफला भूमि ।

भारत कृषीप्रधान देश आहे. भारतीय शेतकरी अतिशय कष्ट करून पर्यावरणाचा समतोल साधत अन्नधान्याचे उत्पादन करून देशाला समृद्ध करतो. याचे वर्णन प्रस्तुत पाठात केले आहे.



भूमि येव अम्हाकं भारतीयानं पधानो आजीवो । कसिकम्मं हि अम्हाकं पधानो आजीवो । वस्साकालस्स पुब्बेयेव कस्सका नङ्गलेन कसन्ति भूमिं, वपन्ति च बीजानि भूमियं । ततो च आगच्छति पावुसकालो । आकासे वातो मेघमालं मन्दं मन्द नुदति । मेघे दिस्वा मोरा मज्जन्ति च नच्चन्ति च । अथ आकासतो मेघा खेत्तेसु वारिं सिञ्चन्ति तेन च वारिना तुस्सति सा तण्हाकुला भूमि । वारिनो सिञ्चनेन रजोपि सम्मति । अथ कतिपयेहि एव दिवसेहि सद्दला होति भूमि । ततो परं यथाकालं भूमिया सस्सं जायति । तेन हरितेन सस्सेन तुस्सन्ति हदयानि कस्सकानं । इज्झन्ति तेसं मनोरथा । धञ्ञेन परिपुण्णानि होन्ति कोट्ठागारानि । एवं च –

पुनप्पुनं चेव वपन्ति बीज, पुनप्पुनं वस्सति मेघराजा ।
पुनप्पुन खेत्तं कसन्ति कस्सका, पुनप्पुनं धञ्ञमुपेति रट्ठं ।।

आकासा पतितं वारि, भूमियं पविलीयति ।
भूमिया जायते सस्सं, ततो अन्नं, ततो बलं ।।

अन्नदं बलदं चेव, वण्णदं सुखदं तथा ।
सुजलं सुफलं भूमिं, वन्दाम मातरं ।।

*(स्वयंरचित)*



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**येव** (अ) (एव) - च
**कसि** (स्त्री.) - शेती, कृषी
**कम्म** (नपुं.) - काम
**पधान** (वि.) - प्रमुख
**आजीव** (पुं.) - उदरनिर्वाहाचे साधन
**वस्सा** (स्त्री.) - पाऊस
**हरित** (वि.) - हिरवा
**हदय** (नपुं.) - हृदय
**इज्झति** (क्रि.) - सफल होणे
**मनोरथ** (नपुं.) - इच्छा, मनसुबा
**कोट्ठगार** (नपुं.) - धान्याचे कोठार
**पुनप्पुनं** (क्रि.वि.) - पुनःपुन्हा
**उपेति** - जवळ जाणे, प्राप्त होणे
**पविलीयति** - विलीन होणे
**ततो** (अ.) - त्यापासून, त्यानंतर
**परं** - (क्रि.वि.) - नंतर
**रज** (नपुं.) - धूळ
**सम्मति** (क्रि.) - शांत होणे
**सद्दला** (वि.) - हिरवळलेली
**सस्स** (नपुं.) - पीक
**जायति** (क्रि.) - जन्मास येणे, निर्माण होणे
**पुब्बे** (अ.) - **पुब्बं** (पूर्व) - सप्तम्यन्त अशी दोन अव्यये 'आधी' ह्या अर्थाने पालित येतात.
**वपति** (क्रि.) - पेरणे
**पावुसकाळ** (पुं.) - पावसाळा
**मज्जति** (क्रि.) - आनंदित
**नच्चति** (क्रि.) - नाचतो
**वारि** (नपुं.) - पाणी
**सिञ्चति** (क्रि.) - सिंचन करणे, शिंपडणे
**तुस्सति** (क्रि.) - सन्तुष्ट
**तण्हा** (स्त्री.) - तहान, तृष्णा
**आकुल** (वि.) - व्याकूळ

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**
   (१) भारताचा मुख्य व्यवसाय कोणता आहे ?
   (२) भारतीय लोकांचे मुख्य उदरनिर्वाहाचे साधन कोणते आहे ?
   (३) आकाशातील ढगांना पाहून मोर काय करतात ?
   (४) शेतातील हिरवे पीक पाहून शेतकऱ्यांना काय वाटते ?

२. **खालील क्रियापदांस रूपे द्या.**
   (१) सिञ्चति, नच्चन्ति, तुस्सति, नुदति, इज्झन्ति ।

### टिपण

- भारतीय कृषीचे महत्त्व स्पष्ट करणे.
- शेतीच्या साधनांचा परिचय करणे.

***



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

पञ्चमो पाठो ।

# वानरिन्दो च कुम्भिलो च ।

दुष्ट शत्रूला प्रसंगी युक्तीने फसवावे लागते हे या कथेत सांगितले आहे.

एको पीनो वानरिन्दो एकचरो नदीतीरे विहरति । अपरापरं गच्छति । तस्सा नदिया एको कुम्भीलो सपजापतिको वसति । कुम्भीलस्स भरिया एकदा कपिं पस्सति । तस्स हदयमंसे दोळहं उप्पादेति । कुम्भीलं वदति, 'मय्ह खो अय्य, वानरिन्दस्स हदयमंसे दोळह उप्पन्नो' ति । नदीतीरे पिट्ठिपासाणे निपज्जति ।

वानरिन्दो सायण्हसमये पासाणं ओलोके' ति । चिन्तेति च, 'अयं पासाणो इदानि उच्चतरो खायति किन्तु खो कारणं' ति । किञ्चि वीमंसेति । पासाणं पुच्छति, 'किं अज्ज मय्ह पटिवचनं न देसी' ति । कुम्भीलो चिन्तेति, 'अद्धा, अयं पासाणो वानरिन्दस्स पटिवचनं देति । अहम्पि ददामी' ति ।



'किं भो वानरिन्दा' ति ।

'को'सि तवं' ति ।

'अहं कुम्भीलो' ति ।

'किमत्थं निपन्नोसी' ति ।

'तव हृदयमंसं इच्छामि' ति ।

वानरिन्दो चिन्तेति, 'अञ्ञो मे गमनमग्गो नत्थि । अज्ज अहं कुम्भीलं वञ्चयामी' ति । वानरिन्दो वदति, 'सम्म कुम्भीलं, त्वं मुखं विवर । अहं तव सन्तिकं आगच्छामी' ति । यदा कुम्भीलो मुखं विवरति नेत्ते च निमीलति । वानरिन्दो तथारूपं तं पस्सति उप्पतति । कुम्भीलस्स मत्थकं अतिक्कमति । विज्जुल्लता विय परतीरं गच्छति ।

*(वानरिन्द जातक, आवश्यक बदल करून)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

पीन (वि.) - धष्टपुष्ट
एकचर (वि.) - एकटाच हिंडणारा
वीमंसेति (वी+मंस वर्त.का.तृ.पु.ए.व.) - विचार करतो
पटिवचनं (नपुं.) - उत्तर, प्रतिउत्तर
कपि (पुं.) - वानर
हदयमंसे (नपुं.) - सप्तमी ए.व. - हृदयाच्या मांसाविषयी
दोळह (नपुं.) - इच्छा, डोहाळे
उप्पादेति (उत+पद प्रयोजक वर्त.का.तृ.पु.ए.व) - उत्पन्न झाली
खो (अ.) - खरोखर

वानरिन्द (पुं.) - वानर
अपरापरं (अ.) - इकडून तिकडे
सपजापतिको (वि.) - पत्नीसह
भरिया (स्त्री.) - भार्या, पत्नी
अद्धा (अ.) - खरोखर
निपन्नोसि - पडलेला आहेस
सम्म - मित्रा
विवर - उघडणे
सन्तिकं (अ.) - जवळ



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

**यदा-तदा** - जेव्हा-तेव्हा
**नत्ते** (नपुं. - प्रथमा अ.व.) - नेत्र, डोळे
**निमीलन्ति** (वर्तमानकाळ तृ.पु.अ.व) - मिटतात
**अतिक्कमति** - ओलांडतो
**विय** (अ.) - सारखे

**साधु** (अ.) - ठीक आहे, होय
**पिट्ठिपासाणे** - पाषाणावर
**निपज्जति** (नि+पज्ज वर्त.का.तृ.पु.ए.व.) - पहुडतो
**इदानि** (अ.) - आता, सध्या
**खायति** (वर्त.का.तृ.पु.ए.व.) - भासतो, वाटतो

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**
   (१) मगराला पत्नीने काय मागितले ?
   (२) वानराने मगराला कसे ओळखले ?
   (३) वानराने मगराला कसे फसविले ?

२. **रूपे ओळखा.**
   कुम्भीलस्स, कपिं, गच्छति, ददामि

३. **संधी विग्रह करा.**
   अहापि, नत्थि

**टिपण**

- प्रसंगावधान, बुद्धिचातुर्य
- प्रसंगानुरूप निरीक्षण करून निर्णय घेणे.

★ ★ ★



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

छट्ठो पाठो ।

# एकङ्गदस्सिनो विवदन्ति ।

कोणत्याही गोष्टीचे सर्व बाजूंनी ज्ञान झाल्याशिवाय खरे स्वरूप कळत नाही. एकांगी मत पूर्ण सत्य नसल्यामुळे त्यातून वादविवाद, भांडण कसे निर्माण होते आणि ज्ञानी माणूस ते भांडण कसे मिटवतो हे या पाठात सांगितले आहे.



एकदा किर एकस्मिं नगरे केचि जच्चन्धा राजमग्गेन गच्छन्ति । अथ एको हत्थिगोपको हत्थिनो नहानत्थं हत्थिना सद्धिं, पटिपथेन नदिं गच्छति । जच्चन्धेहि घण्टाय सद्दं सुत्वा पुच्छितं – 'कस्सायं सद्दो' ति ? 'हत्थिनो घण्टा एसा' ति । पुन तेहि पुच्छितं – 'कीदिसो अयं पसु हत्थी नामो' ति । हत्थिं दट्ठुकामा मयं' ति ।

हत्थिगोपको 'पस्सन्तु, अय्या, हत्थी' ति । वत्वा हत्थिं तेसं सन्तिकं उपनेति । सो तेसं एकच्चस्स हत्थिनो सीसं फुसितुं देति, 'एदिसो हत्थी' ति । एकच्चस्स कण्णं, एकच्चस्स दन्त, एकच्चस्स सोण्डं, एकच्चस्स कायं, एकच्चस्स पादं, एकच्चस्स नङ्गुट्ठं च दस्सेति । पुन च हत्थिगोपको पुच्छति – 'दिट्ठो, अय्या, तुम्हेहि हत्थी, ति ? 'आम भो' ति । 'कीदिसो सो' ति ।

अथ येन हत्थिस्स सीसं फुसितं तेन एवं वुत्तं – 'एदिसो, सम्म हत्थी, सेय्यथापि कुम्भो' ति । येन कण्णो फुसितो तेन वुत्तं – 'हत्थी खो सुप्पसदिसो' ति । येन दन्तो फुट्ठो सो वदति – 'नेवं, हत्थी खीलसदिसो येव होती' ति । येन सोण्डा फुट्ठा तेन वुत्तं – 'एदिसो हत्थी सेय्यथापि नङ्गलीसा' ति । अञ्ञेपि हत्थिस्स कायं पादं नङ्गुट्ठं वालधिं च फुसित्वा अनुक्कमेन 'हत्थी कोट्ठसदिसो', 'थुणसदिसो', 'मुसलसदिसो', 'समज्जनीसदिसो' ति वदन्ति । एवं तेसु भण्डनं जातं, कलहो उप्पन्नो । 'एदिसो हत्थी, नेदिसो हत्थी' ति ते विवदन्ति । अथ एको पण्डितो पुरिसो तेसं कलहं दिस्वा, तस्स कारणं च अधिगन्त्वा, तेसं सब्बेसं हत्थिस्स सब्बानि अङ्गानि फुसितुं देति । तदा हत्थिं यथाभूतं अधिगन्त्वा ते वदन्ति –

'एकङ्गदस्सिनो नून, विवदाम निरत्थकं ।
यथाभूतेन ञाणेन, विवादो वूपसम्मती' ति ॥

*(उदान, पठमनानातित्थियसुत्तं, आवश्यक ते फेरफार करून)*



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**एकङ्गदस्सी** - केवळ एकच बाजू किंवा अवयव पाहणारा
**जच्चन्ध** (वि.) - जन्माने आंधळा
**हत्थिगोपक** (पुं.) - हत्तीचा माहूत
**सद्द** (पु.) (शब्द) - आवाज
**पसु** (पुं.) (पशु) - प्राणी
**फुसित** - स्पर्श करून चाचपलेला
**सोण्डा** (स्त्री.) - सोण्ड
**नङ्गुट्ठ** (नपुं.) - शेपूट
**सुप्प** (नपुं.) - सूप
**नङ्गलीसा** (नपुं.) - नांगराच्या फाळासारखा
**थुणा** (स्त्री.) - खांब
**भण्डनजात** (वि.) - भांडण उत्पन्न झाले
**ञाण** (पुं.) - ज्ञान
**फुसितुं** (तुमन्त अव्यय) - स्पर्श करण्यास
**यथाभूत** (वि.) - यथार्थ
**विवदन्ति** (क्रि.) - वादविवाद करतात
**राजमग्ग** (पुं.) - राजमार्ग
**घण्टा** (स्त्री.) - घंटा
**एकच्च** (वि.) - एक, काही
**कण्ण** (पुं.) - कान
**दन्त** - दात
**काय** (पुं.) - शरीर
**कुम्भ** (पुं.) - घडा
**खील** (पुं.) - खुंटी
**कोट्ठ** (पुं.) - धान्य कोठीसारखे, कणगी
**सम्मज्जनी** (स्त्री.) - झाडूसारखा
**निरत्थक** (अ.) - विनाकारण, व्यर्थ
**विवाद** - मतभेद, कलह
**अधिगन्त्वा** (पूर्वकालवाचक त्वान्त अव्यय) - जाणून
**वूपसम्मति** (क्रि.) - मिटतो, शांत होतो

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) हत्ती सुपासारखा आहे असे म्हणणाऱ्या जन्माने आंधळ्याने हत्तीच्या कोणत्या अवयवाला स्पर्श केला ?
(२) ज्या आंधळ्याने शेपटीच्या केसांना स्पर्श केला त्याला हत्तीचे रूप कसे वाटले ?
(३) सर्व जन्मांधळे 'एकङ्गदस्सी' होते म्हणजे काय ?

**२. रूपे ओळखा.**

हत्थिस्स, वदन्ति, फुसितुं, अधिगन्त्वा

### टिपण

- व्यापक दृष्टी निर्माण करणे.
- त्रोटक ज्ञानाने वादविवाद होतात. संपूर्ण ज्ञानाने वादविवाद मिटतात.

★ ★ ★



Get More Learning Materials Here : CLICK HERE www.studentbro.in

सत्तमो पाठो ।

# नामेन सिद्धि नत्थि ।

माणसाचे नाव महत्त्वाचे नसून कर्म आणि आचरण महत्त्वाचे आहे.

---

अतीते तक्कसिलायं बोधिसत्तो आचरियो अहोसि । तस्सको माणवको 'पापको' नाम नामेन अत्थि । आचरियो तं 'एहि पापक' याहि पापका' ति वुच्चति । पापको चिन्तेसि 'मय्ह नाम अवमङ्गलं । अञ्ञं नामं मे होतु' ति । सो आचरियं आह 'आचरिय, मय्ह नाम अवमङ्गलं । 'अञ्ञं मे नामं कारेथा' ति । आचरिय तं अवोच 'गच्छ तात, जनपद चारिकं चरित्वा अत्तनो अभिरुचितं एकं मङ्गलं नामं आनय । तं अञ्ञं नामं ते करिस्सामी' ति । पापको 'साधू' ति वत्वा निक्खमति ।

गामेन गामं चरति । एकं नगरं आगच्छति । तत्थचेको पुरिसो कालङ्कतो जीवको नाम नामेन । पापको तस्स ञातिजनं पुच्छि - 'किं नामेन पुरिसो' ति ? ''जीवको' ति ।'' ''जीवकोपि मरती' ति ?'' ''जीवकोपि मरति, अजीवको पि मरति ।'' नामं नाम पण्णत्तिमत्तं । त्वं बालो मञ्ञे' ति ।

पापको तं कथं सुणित्वा चिन्तेति । अन्तोनगरं गच्छति । अथेकं दासिं सामिका द्वारे रज्जुया पहरति । पापको सामिकं पुच्छि 'कस्मा इमं पोठेथ' ति । 'भतिं दातु न सक्कोती' ति ।'' किं पनस्सा नामं' ति ।'' 'धनपाली नामा' ति ।'' ''नामेन धनपाली समानपि भतिमत्तं दातुं न सक्कोती' ति । धनपालियोपि, अधनपालियोपि दुग्गता होन्ति । नामं नाम पण्णत्तिमत्तं । त्वं पन बालो मञ्ञे' ति ।

पापको तं पि कथं सुणाति । बोधिसत्तो आचरियस्स सन्तिकं आगच्छति वुच्चति च । ''आचरिय, नामं नाम पण्णत्तिमत्तं । नामेन सिद्धि नत्थि, कम्मेनेव सिद्धि । अलं मय्ह अञ्ञेन नामेन । तदेव मे नामं होतू' ति ।

*(नामसिद्धिजातक - आवश्यक बदल करून)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**नामेन** (नपुं. तृतीय ए.व.) - नावाने, नाम
**माणवको** (पुं.) - शिष्य
**नाम** (अ.) - म्हणजे, म्हणून
**एहि** (आज्ञार्थ) - येइ
**होतु** (आज्ञार्थ तृ.पु.ए.व.) - व्हावे
**याहि** (आज्ञार्थ द्वि.पु.ए.व.) - जा, या
**आह** (ब्रू. भूतकाळ तृ.पु.ए.व.) - म्हणाला
**भति** - मजुरी, पगार, मोबदला
**समाना** ('अस' व.का.धा.वि. (स्त्री.प्रथमा, ए.व.) - असणारी
**जनपदचारिकं** - गावोगाव फिरून
**ञातिजनं** - नातेवाईक
